सामर्थ्य महाराष्ट्राचे



# सोशल नेटवर्किंग होणार मूल्यकेंद्रित - आपटे

सकाळ वृत्तसेवा
Thursday, November 10, 2011 AT 02:00 AM (IST)
Tags: facebook, social networking, pune

पुणे - "फेसबुकवर मी पाचशे मित्र जोडले आहेत,' असे अभिमानाने सांगणाऱ्यांची संख्या आपल्याकडे कमी नाही, पण त्यापैकी खरंच किती लोकांशी आपण दररोज बोलतो, ते खरंच आपले मित्र आहेत का आणि या लोकांचा आपल्याला कितपत फायदा होतो, याचा विचार केलाय कधी?

सोशल नेटवर्किंग साइटवर बहुतांश वेळ घालविणाऱ्या तरुणाईला जर हे प्रश्‍न पडले, तर त्यात आश्‍चर्य वाटायला नको, कारण आजचे सोशल नेटवर्किंग हे प्रामुख्याने आपले "कॉन्टॅक्‍ट' वाढविण्यासाठी वापरले जाते. येत्या काळात मात्र त्याचे स्वरूप बदलणार असून, "सोशल नेटवर्किंग 2.0' हे अधिक मूल्यकेंद्रित होईल, अशी माहिती सोशल मीडिया क्षेत्रातील तज्ज्ञ नरेश आपटे यांनी बुधवारी दिली.

एक्‍सटेन्शिया कंपनीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात आपटे यांनी हा "ट्रेंड' सांगितला. कार्यक्रमाला एक्‍सटेन्शिया कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमीद कोठावाला, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर चेतन शेट्टी आदी उपस्थित होते. आपटे यांनी नुकतेच www.thotofthis.com हे संकेतस्थळ सुरू केले असून, तरुणाईचे विचार, मत आणि प्रश्‍नांना त्यामध्ये महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

ते म्हणाले, ""सध्याच्या सोशल नेटवर्किंगमध्ये एखाद्या व्यक्तीला स्टेटस अपडेट, फोटो किंवा विशिष्ट प्रकारची माहिती अपलोड करण्याची सोय आहे. पण आपल्या "फ्रेंड लिस्ट'मध्ये असलेल्या शेकडो मित्र-मैत्रिणींना नेमके काय पहायचे आहे, कोणती माहिती पाहिजे आहे, हे कोणालाच सांगता येत नाही. "कॉन्टॅक्‍ट' वाढविण्यासाठी आज वापरले जाणारे सोशल नेटवर्किंगचे मूल्य काय, असा प्रश्‍न तरुणाई यापुढे विचारेल."

""एका मोठ्या सोशल नेटवर्कमध्ये वैयक्तीय, पर्यटन आदी विविध विषयांवर माहिती देणारे छोटे-छोटे "ग्रुप' तयार होतील. एखाद्या अनोळखी व्यक्तीवर विश्‍वास ठेवून निर्णय घेण्याऐवजी आपल्याच मित्रांपैकी जर कोणी या गटामध्ये उपयुक्त माहिती दिली असेल तर ती आपल्याला अधिक विश्‍वसनीय वाटेल. त्यामुळे सोशल मीडिया हा फक्त संपर्कात राहण्यासाठी नसून, त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो, हे लोकांना समजेल,'' असेही आपटे यांनी सांगितले.

संबंधित बातम्या

- फेसबुकमुळे तो भेटला अकरा वर्षांनी आईबाबांना
- अजब ताकद वापर मात्र योग्य हवा
- 'फेसबुक'चे भारतात कार्यालय सुरू
- 'दादा', 'मामां'ना नेटीझन्सनेही दिला झटका
- तुमचेही 'फेसबूक' चोरीला जाऊ शकते !

ताज्या घडामोडी

- उत्तर प्रदेशचा चार राज्यांत विभाजनाचा प्रस्ताव
- भारताचा डाव ६३१ वर घोषित; विंडीज २ बाद ३४
- वाग्दत्त वधूला पेटवणाऱ्या अनुश्रीला कोठडी
- ऑस्ट्रेलिया पुन्हा देणार भारताला युरेनियम
- ड्रोन हल्ल्यात पाकमध्ये ७ दहशतवादी ठार
- पेट्रोल दोन रुपये स्वस्त होणार